MHYA110000702009

नि.दि.दा.क्र. 28/2009
CNR-MHYA110000702009

## नि. क्र. 97 वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. 07 आत्माराम गंगाराम मोरे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दिलेला आहे. वादीचे कथनानुसार अर्ज मुदतीत आहे. प्रतिवादी क्र. 7 चे मृत्यु प्रमाणपत्र हजर केलेले आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती त्याने केली आहे.

2. प्रतिवादींनी म्हणणे देवुन अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने मयत प्रतिवादीचे वारस प्रमाणपत्र हजर केलेले नाही. तसे वारसा प्रमाणपत्र सक्षम न्यायालयाकडुन मिळविणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

3. उभय पक्षकारातर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

4. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रतिवादी क्र. 7 आत्माराम गंगाराम मोरे यांचे मृत्यु प्रमाणपत्र निशाणी 99/1 कडे दाखल केले आहे. त्याचे अवलोकनावरुन प्रतिवादी क्र. 7 हे दिनांक 26/02/2019 रोजी मौजे कुपटी ता. उमरखेड येथे मयत झाल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा अर्ज दिनांक 27/03/2019 रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे तो मुदतीत असल्याचे दिसुन येते. मयत प्रतिवादी क्र. 7 याला अर्जात नमुद वारस हेच वारस असल्याबाबत उपसरपंच ग्रामपंचायत कुपटी यांनी दिलेल्या दाखल्यावरुन (निशाणी क्र. 99/2) दिसुन येते. दावा वाटपासाठी आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. 7 चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्याशिवाय दाव्याची अंतिम निर्गती होणार नाही. प्रतिवादी म्हणतात तसे सक्षम न्यायालयाकडुन वारसा प्रमाणपत्र मिळवलेच पाहिजे अशी आवश्यकता

नाही. प्रस्तावित वारस हे प्रतिवादी क्र. 7 चे वारस नसल्याबाबत त्यांचा आक्षेप नाही. या सर्व बाबींचा विचार करता अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

5. या सर्व बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

अर्ज मंजुर करण्यात येतो.

स्वा/–
(अविनाश म. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
उमरखेड

दिनांक : 03/07/2019